# आपत्कालीन पुरपरिस्थितीत पोलीसांनी वाचवले नागरीकांचे प्राण

गडचिरोली जिल्हयात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे भामरागड व चामोर्शी तालुक्यामध्ये पुरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून अनेक नद्यांना पुर आलेला आहे. पोलीस विभागाकडून युध्दपातळीवर नागरीकांना सुरक्षित स्थळी पोहचवणे, त्यांच्या मालमत्तेचे विस्थापन करणे, पुरामध्ये अडकलेल्या नागरीकांचा जीव वाचवून त्यांना सुरक्षित स्थळी पोहचवण्याचे काम पोलीस विभागाकडून करण्यात येत आहे. पर्लकोटा नदीला आलेल्या पुराचे पाणी भामरागड शहरात शिरले असून त्यामुळे नागरीकांच्या जीवीताचे रक्षण व मालमत्तेचे विस्थापनाचे मुख्य कार्यात भामरागड व चामोर्शी पोलीसांकडून मोठया प्रमाणात आपत्कालीन युध्दपातळीवर मदत होत आहे.

भामरागड येथे शहरात पाणी शिरल्यामुळे तेथील नागरीकांना व त्यांच्या घरातील, दुकानातील सामान तसेच लहान मुले यांना बोटीच्या सहाय्याने सुरक्षित स्थळी हलविण्यात भामरागड पोलीस स्टेशनच्या रेस्क्यु टीमला यश आले आहे.

त्याचबरोबर जिल्हयातील पोलीस स्टेशन चामोर्शी अंतर्गत येणाऱ्या मौजा रामपूर येथे काल दिनांक १८/०७/२०१७ रोजी सपनदास व मंगला हे पती-पत्नी रोहण्यासाठी शेतात गेले होते. पण अचानक शेताजवळील नाल्याला पुर आल्यामुळे ते दोघे शेतातच अडकले. आज दिनांक १९/०७/२०१७ रोजी सकाळी रामपूर गावचे पोलीस पाटील यांनी याबाबत चामोर्शी पोलीस स्टेशनला माहिती दिली. त्यानंतर चामोर्शी पोलीस स्टेशनचे पोउपनि. गोपाल ढोले व त्यांची टीम घटनास्थळावर रवान होवून त्यांनी पुरामध्ये अडकलेल्या पती-पत्नी यांना सुरक्षित बाहेर काढले.

तसेच चामोर्शी तालुक्यातील पोमके घोट हद्दीतील हळदवाही शेत शिवारात एकुण ६ नागरीक व १ जनावर हे पुरात अडकले होते. त्यांना बाहेर निघण्याचा कोणताही मार्ग नसतांना पोलीसांनी आपत्कालीन बोटीने तात्काळ घटनास्थळी जावून नागरीकांना सुरक्षित स्थळी पोहचवून त्यांचे प्राण वाचवले. जिल्हयातील महत्वाच्या नद्यांजवळ पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला असून नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी बंदोबस्त लावण्यात आला आहे.

---







